
# २. सुमनसुत्तं

**प्रस्तावना**

सुमन नावाच्या राजकुमारीने तथागतांना एक प्रश्न विचारला, की जर दोन्ही व्यक्तीची श्रद्धा आणि ज्ञान समान असल्यास आणि त्यांतील एक दान करणारी (दायको) आणि दुसरी दान न करणारी (अदायको) असली तर त्यांच्या आयुष्यात (जीवनात) काही वैशिष्ट्य किंवा वेगळेपण दिसून येत असते का?

त्यावर बुद्धाने हे सुत्त सांगून असे स्पष्ट केलेले आहे की, दायकाकडे (दान देणाऱ्या), अदायका (दान न देणाऱ्या) पेक्षा पाच विशिष्ट गुण दिसून येतात आणि ते पाच गुण म्हणजे आयु, वण्ण (वर्ण), सुख, यश आणि ऐश्वर्य (भोग) असे सांगतात.


थोडक्यात या गाथांमध्ये दान देण्याचे महत्त्व (लोकसहाय्य) सांगितले आहे.



''यथापि चन्दो विमलो, गच्छं आकासधातुया।

सब्बे तारागणे लोके, आभाय अतिरोचति।।

''तथेव सीलसम्पन्नो, सद्धो पुरिसपुग्गलो।
सब्बे मच्छरिनो लोके, चागेन अतिरोचति।।
''यथा पि मेघो थनयं, विज्जुमाली सतक्ककु।
थलं निन्नंच पूरेति, अभिवस्सं वसुन्धरं।।
''एवं दस्सनसम्पन्नो, सम्मासम्बुद्धसावको।
मच्छरिं अधिगण्हाति, पञ्चठानेहि पण्डितो ।।
''आयुना यससा चेव, वण्णेन च सुखेन च।
स वे भोगपरिब्यूळ्हो, पेच्च सग्गे पमोदती'' ति।।



**(अङ्गुत्तरनिकायो–सुमनवग्गे)**

## शब्दार्थ

**विमलो – (वि.)** निर्मळ, स्वच्छ
**अतिरोचति – (क्रि.)** अधिक तेजस्वी होतो
अधिक तेजाने झळकतो, अधिक चमकतो
**सतक्ककु – (वि.)** शंभर टोकांच्या
**थलं निन्नञ्च – (नपुं.)** जमीन, उंचसखल भाग
**मच्छरिं – (ना.)** कंजूष माणूस
**आयुना – (तृ. वि)** आयुष्य
**भोग – (तृ. वि.)** ऐश्वर्य
**पमोदती – (क्रि.)** आनंदीत होतो, फार प्रसन्न होतो
**तारांगणे – (पु.)** तारांगण
**थनयं – (ना.)** – गडगडाट
**विज्जुमाली – (स्त्रि.)** वीज
**अभिवस्सं – (ना.)** वर्षा पाऊस
**अधिगण्हाति – (क्रि.)** पार करतो
**यससा – (तृ. वि.)** यश, यशस्वी
**परिब्युळ्हो –** वाढणे

---

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) चंद्र कसा असतो ?
२) चंद्र कुठून जातो ?
३) चंद्राचे चांदणे तारकांना काय करते ?
४) कंजूष माणसाला कशाने झाकाळून टाकता येते ?
५) पाऊस काय करतो ?
६) सम्मासम्बुद्धाचे सावक कसे असतात ?
७) हुशार व्यक्ती कंजूष माणसापेक्षा कोणत्या गुणानी युक्त असतो ?
८) कवितेत कशाच्या उपमा दिल्या आहेत ?
९) ‘दान’ या शब्दासाठी कुठला शब्द वापरला आहे ?

**२. सत्य / असत्य लिहा.**

१) यथापि चन्दो मलो । गच्छं आकासधातुया।
२) सब्बे तारांगणे लोके, आभाय अतिरोचेति।
३) यथापि मेघो वस्सं, विज्जुमाली सतक्ककु।
४) मच्छरिं अधिगण्हाति, छठानेहि पण्डितो ।
५) आयुना यससा चेव, वण्णेन च सुखेन च ।

## ३. सूचनेनुसार कृती करा

१) पमोदति – (काळ ओळखा)

२) अधिगण्हाति – (विग्रह करा)

३) पुरेति – (काळ ओळखा)

४) अतिरोचेति – (विग्रह करा)

## ४. रूपे ओळखा.

१) रोचेति,

२) पुरेति

३) पमोदति

४) गण्हाति

## ५. संधी करा/ विग्रह करा.

१) सम्मासम्बुद्धसावको

२) सीलसम्पन्नो

३) विज्जुमाली

४) पुरिसपुग्गला

## ६. वाक्ये पूर्ण करा.

१) सब्बे तारागणे........., ............।।

२) .................., सद्धो पुरिसपुग्गलो ।

३) यथापि............ थनयं, .......... सतक्कु।

४) एवं.........., ..........सावको।

५) आयुना........चेव,................।

६) मच्छरिं.........., ......... पण्डितो।।

## ७. माध्यम भाषेत अर्थ लिहा.

१) विमलो

२) मेघो


३) विज्जुमाली

४) मच्छरिं


५) वसुन्धरं

## ८. कवितेच्या आधारे रेखाजाळे पूर्ण करा.

(१)




(२)




☆☆☆